**प्रेस नोट**

स्थागुशा,जळगांव
दि.०५/०४/२०१६

प्रति,

मा. संपादक

----------------------------

## " संशयीत आरोपीचे घरात मिळाले दोन जिवंत हरीण "

बोदवड पोलीस स्टेशन भाग ५ गुरनं १/२०१६ भादवि क.४५७,३८० मधील गुन्हयातील आरोपी व गेलामाल याचा शोध घेणेकामी गुप्तबातमीदारामार्फत पोलीस निरीक्षक श्री राजेशसिंह चंदेल,स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांना माहिती मिळाल्याने त्यांनी डॉ.श्री.जालिंदर सुपेकर,पोलीस अधीक्षक,जळगाव यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोहेकॉ उत्तमसिंग महासिंग पाटील, पोहेकॉ संजय प्रभाकर पाटील, पोहेकॉ दिलीप पंढरीनाथ येवले, पोहेकॉ विजय पाटील,पोना बापु लोटन पाटील, पोना ईश्वर सुरेश सोनवणे, पोकॉ योगेश बापु पाटील, पोकॉ मनोज अशोक दुसाने व चापोना दिपक पाटील अशांचे पथक तयार करुन सदर गुन्हयाचा समांतर तपास करणेबाबत आदेशित केल्याने सदर पथकाने गुन्हयातील संशयीत सचिन काळु मोरे वय ३६ रा.भिलाटी,बोदवड जि.जळगाव याचे घरी जावुन त्यास ताब्यात घेतले त्याचे कब्जात दोन जिवंत वन्यप्राणी (हरीण) मिळुन आले. त्याबाबत विचारपुस करता त्याने सदर दोन जिवंत वन्यप्राणी (हरीण) हे तस्करीकामी आणले असल्याचे कबुल केले.

त्या अनुषंगाने पुढील योग्य त्या कायदेशिर कार्यवाहीकामी पोलीस निरीक्षक बोदवड पोलीस स्टेशन यांना कळविले असता त्यांनी वनपाल श्री व्ही.आर.उपासनी व बोदवड पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांना घटनास्थळी पाठविले असता आरोपी सचिन मोरे व दोन जिवंत वन्यप्राणी (हरीण) त्यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

**पोलीस निरीक्षक**
**स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव**